## सभा इतिवृत्त

मा.अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी महाड विभाग महाड यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र औद्योगिक वसाहत व सावित्री नदी/खाडी प्रदुषणाबाबत स्थानिक पर्यावरण रक्षण व संवर्धन समितीची सभा दिनांक २७/०५/२०१४ रोजी आयोजीत करण्यात आली होती. त्या सभेस खालील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते त्याचे सविस्तर इतिवृत्त खालील प्रमाणे.

| अ.क्र.नं. | अध्यक्ष/सदस्य/स्थानिक सदस्य/सचिव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.रविंद्र हजारे | अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी महाड |
| २ | श्री. संदीप कदम | सदस्य तथा तहसिलदार महाड |
| ३ | श्री.डी.बी.पाटील | सदस्य सचिव उप प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मं.महाड |
| ४ | श्री. एस.आर.पाटील | सदस्य कार्यकारी अभियंता मऔविम महाड |
| ५ | डॉ. सुधीर पटवर्धन | स्थानिक सदस्य |
| ६ | श्री.माधव बागडे | स्थानिक सदस्य |
| ७ | श्री.अशोक न.तलाठी | सदस्य, एम.एम.ए प्रतिनिधी महाड |
| ८ | श्री.गजानन पवार | क्षेत्र अधिकारी म.प्र.नि.मं.महाड |
| ९ | श्री.दर्शन म्हात्रे | क्षेत्र अधिकारी म.प्र.नि.मं.महाड |

प्रथम सभेस मा.अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी महाड, जि.रायगड यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभेस सुरवात करण्यात आली. त्यामध्ये खालील मुद्दयावर चर्चा करण्यात आली.

| अ.क्र. | विषयाचे नाव | विषयाचे निराकरण व करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | सावित्री नदी/खाडी किनारी असणाऱ्या पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत तपासणे. | या संदर्भात उप-प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ महाड यांनी सांगितले की, या कार्यालयाकडून प्राथमिक आरोग्य केंद्रात पत्र पाठविले असून त्या नूसार खाडी किना-यासह बिरवाडीच्या परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने तपासणे गरजेचे आहे असे ठरले. |
| २ | श्री.रा.ऊ.पाटील यांनी उपस्थित केलेला विषयः- महाड नगर परिषद क्षेत्रातील सांडपाणी नदीला मिळून होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी उपाय योजना करावी लागेल. | या संदर्भात उप विभागीय अधिकारी, महाड यांनी सांगितले की, श्री. रा.ऊ. पाटील व मुख्याधिकारी , नगरपरिषद महाड यांचे सोबत चर्चा झाली असून,श्री. रा.ऊ. पाटील यांची बदली झाले कारणाने प्रश्न प्रलंबित राहीला असून त्याबद्दल पुढील विचारविनिमय चालू आहे. |
| ३ | श्री.माधव बागडे यांनी बिरवाडी ग्रामपंचायत हद्दीतील नाल्यावर बंधारा बांधणे व एमआयडीसी येथील जॉकवेल वर एमआयडीसी चा ऑपरेटर हजर नसतो असे सूचविले. | या संबधात श्री. कार्यकारी अभियंता, MIDC महाड यांनी सांगितले की, सध्या टाकलेल्या मातीचा बंधारा देखील पाणी अडविण्याचे काम करतोय परंतु कायमस्वरूपी कॉंक्रीट बंधारा घालण्याचे विचाराधीन आहे. |
| ४ | एमआयडीसी येथे हवा प्रदूषण यंत्रणा बसविण्याबाबत. | उप-प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ, महाड यांनी सांगितले की, म.औ. वि.महामंडळ कार्यक्षेत्रात तीन ठिकाणी हवा तपासणी यंत्रणा बसविण्यासाठीची मंजूरी मुख्यालय म.प्र.नि.मंडळ, मुंबई येथून मिळाली असून ०१/०६/२०१४ पासुन सर्व स्टेशन चालू करण्यात येतील असे सांगण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| ५ | श्रीहरी केमिकल कंपनी ही कोर्टाच्या आदेशाने पुन्हा चालू करण्यात आली त्यामुळे सी.ई.टी.पी.च्या औद्योगिक सांडपाण्याच्या गुणवत्तेवर काही परिणाम झाला किंवा कसे याबद्दल डॉ.पटवर्धन यांनी विचारणा केली. | म.प्र.नि.मंडळ, महाड कडून सांगण्यात आले की, मे. श्रीहरी केमिकल कंपनी ही कंपनीमधून निघणा-या सांडपाण्याचे वर्गीकरण week stream व strong stream या मध्ये करून त्यातील weak stream वर प्रक्रिया करून प्रक्रियायुक्त सांडपाणी CETP मध्ये सोडले जाते व strong stream ची विल्हेवाट लावण्यासाठी spray dryer चे काम चालू आहे.तसेच ETP up gradation चे काम चालू आहे. |
| ६ | प्रदूषण करणाऱ्या कंपन्यावर कार्यवाही करण्याबाबत. | म.प्र.नि.मंडळ महाड यांनी सांगितले की, प्रदूषण करणा-या कंपन्यांवर वेळोवेळी कारवाई चालू असते, परंतु उपविभागीय अधिकारी व उप-प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ, महाड यांनी सांगितले की, CETP ने प्रत्येक महीन्यामध्ये अति प्रदूषित १० कंपन्यांची नावे म.प्र.नि.मंडळास कळविणे. |
| ७ | सुदर्शन केमिकल कंपनी, अशोक अल्कोकेम, लक्ष्मी ऑरगॉनिक व पिडीलाईट कंपनीचे प्रकिया युक्त सांडपाणी जे CETP ला घेलले जाते ते सांडपाणी घेण्याआगोदर तपासून घेतल्यास तसेच MIDC तील इतर लहान कंपन्याचे औद्योगिक सांडपाणी तपासून घेतल्यास CETP वर ताण पडणार नाही असे म.प्र.नि.मं.यांचे अधिकारी यांनी सूचविले. | म.औ. वि.महामंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. पाटील साहेब यांनी या संबंधात सांगितले की, ९ ठिकाणी साठवण टाक्यांचे काम पुर्ण झाले असून त्या लवकरच चालू करण्यात येतील. |
| ८ | औद्योगिक सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिनी संबंधातील NIO चा रिपोर्ट काय आहे या संबंधात उपविभागीय अधिकारी यांनी उपस्थित केलेला प्रश्न ? | कार्यकारी अभियंता श्री. पाटील यांनी सांगितले की, सदर विषयाचा सर्व्हे चालू असून जुनी वाहीनी तपासण्याचे काम चालू आहे व त्यासंबधात टेंडर मागविले असुन पुढील ऑक्टोबर महीन्यात काम पुर्ण होण्याची शक्यता आहे. |
| ९ | खाडी पट्टयातील गावातील कॅन्सर बांधीत रुग्णाबाबत आरोग्य विभागा कडून सर्व्हेक्षण करणेबाबत. | या संबधात उप विभागीय अधिकारी, महाड यांनी सांगितले की, मागे खाडी किनारी गावांचा आरोग्य विषयक सर्व्हे केला असून त्याला ग्रामस्थांनी चांगला प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे मे २०१४ मध्ये पुन्हा सर्व्हे करायचा होता त्याबद्दल स्वतः माहीती घेवून सांगणार आहेत. |
| १० | अतिरीक्त एमआयडीसी मधील MWML कडून उभारण्यात येणाऱ्या घनकचरा प्रकल्पा विषयी | या संबधात डॉ. पटवर्धन साहेब म्हणाले की हा प्रोजेक्ट येथे होवू नये व त्यासबंधात MPCB व MIDC वरीष्ठ स्थरावर बैठक होणार आहे. |
| ११ | MIDC कडून टेमघर नाल्यावर कॉक्रीट बंधारा बांधण्याबाबत. | या संबधात श्री. कार्यकारी अभियंता, MIDC महाड यांनी सांगितले की, सध्या टाकलेल्या मातीचा बंधारा देखील पाणी अडविण्याचे काम करतोय परंतु कायमस्वरूपी कॉंक्रीट बंधारा घालण्याचे विचाराधीन आहे. |
| १२ | औद्योगिक वसाहतीमधील वृक्षारोपणाबाबत. | मागील वर्षी CETP कडून एकूण १०००० झाडे MIDC क्षेत्रात लावण्यासाठी दिली होती, तसेच MMA च्या अधिका-यांनी सांगितले की सर्व कंपन्यांना झाडे लावण्यास सक्तीचे करण्यात येणार असून ५ |

| | | |
|---|---|---|
| | | जून २०१४ या पर्यावरण दिवसाच्या अनुषंगाने सर्व कंपन्याना झाडे लावण्यासाठी प्रोत्साहीत करून ५००० झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. |

सभेमध्ये खालील नवीन मुद्दयांवर चर्चा करण्यात आली.

| अ.क्र. | विषयाचे नाव | विषयाचे निराकरण व करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | MIDC क्षेत्रातील शिवमंदीरातील तलावा विषयी श्री.पाटील साहेब कार्यकारी अभियंता म.औ. वि.महामंडळ यांनी मुद्दा उपस्थित केला. | या संबधात श्री.माधव बागडे यांनी सांगितले की, सदर तलावातील पाणी काढण्याचे काम पुर्ण झाले असून तलावात असणारा गाळ काढण्यासाठी CETP कडून पंपाची व्यवस्था व्हावी व तलावाच्या सुशोभिकरणाचे काम सुध्दा CSR Activity मधून CETP ने करावे त्या संबधात CETP चे श्री. तलाठी यांनी मंजूरी दिली. |
| २ | Corporate social responsibility बद्दल उप विभागीय अधिकारी, महाड यांनी प्रश्न उपस्थित केला. | या संबधात CETP चे श्री. तलाठी यांनी सांगितले की, म.औ. वि.महामंडळ मध्ये जे हुतात्मा स्मारक आहे त्याचे सुशोभिकरण करण्यासाठी CETP तयार आहे, परंतु पुढे सदर स्मारकाची देखभाल कोण करणार याचा प्रश्न आहे.<br>तसेच उप विभागीय अधिकारी, महाड यांनी सुचविले की, MMA ने CSR Activity अंतर्गत शैक्षणिक, खेळ, झाडे लावणे, वगैरे बाबतीत कामे करावीत. |
| ३ | स्थानिक पर्यावरण रक्षण व संवर्धन समितीच्या पुर्नरचनेबाबत.. | डॉ. पटवर्धन यांनी सांगितले की समितीमधील काही सदस्य हे वारंवार गैरहजर रहात असून त्यांची नावे कमी करून नवीन सदस्याला सामावून घेण्यात यावे असे सुचविले. |
| ४ | MIDC मधील अग्निशमन दल कार्यरत नसल्याचे तहसिलदार साहेब यांनी निदर्शनास आणून दिले. | MIDC मधील अग्निशमन दल हे MMA कडे असून ते आता MMA चालविणार नसून MIDC कडे पुर्ण यंत्रणा सुपुर्द करणार आहेत असे श्री.पाटील कार्यकारी अभियंता, MIDC महाड यांनी सांगितले. लवकरच सदर यंत्रणा ही MIDC कडून चालविली जाणार आहे. |

शेवटी अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी महाड विभाग महाड यांनी सभेस उपस्थित राहीलेल्या सर्व सदस्याचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**(डी.बी. पाटील)**
**सदस्य सचिव, तथा उप-प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि. मंडळ, महाड.**

**(रविंद्र हजारे)**
**अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी,**
**महाड विभाग महाड.**